MHNB100002102024

-

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १६३/२०२४**
**सरकार –विरुद्ध– संतोष चंदु तडवी**
**मधील अर्जदार प्रितेश गणेशमल छाजेड याने**
**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४५१ अन्वये दाखल केलेल्या**
**निशाणी क्र.१२ वरील आदेश**

अर्जदार याने प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४५१ अन्वये अपराध क्र. ६५८/२०२३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या हिरो कंपनीची सी.डी.डिलक्स मोटारसायकल क्रमांक एम.एच.–१८/ए.के.–७५४२ क्रमांकाच्या मोटारसायकलचा चेचीस क्रमांक MBLHA11EWD9H04406, त्याचा इंजिन क्रमांक HA11EFD9H27291 या वाहनाचा ताबा मिळण्याकामी अर्ज केला आहे. प्रस्तुत गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

०२) अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जातील नमुद वाहन आरोपीच्या ताब्यातुन जप्त केले आहे. अर्जदार हा जप्त वाहनाचा एकमेव मालक असुन इतर कोणत्याही इसमाने सदर वाहनाचा ताबा मिळविण्यासाठी अर्ज केला नाही. सदर वाहन हे दैनंदिन वापराचे असल्याने अर्जदारास त्याची निंतात आवश्यकता आहे. सदर वाहन पोलीस स्टेशनमध्ये पडून असल्याने त्याच्यातील इलेक्ट्रीक व इलेक्ट्रॉनिक पार्टस निकामी होण्याची शक्यता आहे. सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३) सरकारी वकिलांचे म्हणणे मागविण्यात आले. सरकारी वकिलांनी सदर अर्जावर म्हणणे सादर करुन कथन केले की, सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा आहे. आरोपी हा बेकायदेशीरपणे वाहनासह होता म्हणुन अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे. तपासी अधिकारी यांनी निशाणी क्रमांक १७ वर म्हणणे देवुन कथन केले की, सदरचे वाहन अर्जदाराच्या ताब्यात मे. कोर्टाने योग्य त्या अटी व शर्तीवर देण्यास त्यांची काहीही हरकत नाही.

०४) अर्जदाराचे विधीज्ञ श्री आर.आर.मराठे आणि विशेष सरकारी अभियोक्ता श्री एम.आय.मन्सुरी यांचे युक्तिवाद ऐकले. गुन्हृयांशी संबंधित कागदपत्राचे अवलोकन केले. अर्जदार यांनी अर्जातील कथनाच्या पृष्ठयार्थ अभिलेखावर स्वतःचे प्रतिज्ञापत्र, स्वतःचे आधारकार्ड

साक्षांकित प्रत, जप्त वाहनाचे आर. सी. बुक साक्षांकित प्रत, विम्याची साक्षांकित प्रत दाखल केली आहे. अर्जदार यांनी दाखल केलेल्या दस्ताऐवजावरुन जप्त वाहन अर्जदार यांच्या मालकीचे असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते. तसेच सदरचे वाहन हे अर्जदार यांच्या ताब्यात देण्यास आरोपीची काहीही हरकत नाही असा खुलासा नि.क्र.१८ कडे सादर केलेला आहे.

०५) अभिलेखावरुन व सरकारी अभियोक्ता यांच्या म्हणण्यावरुन असे दिसुन येते की, जप्त वाहन हे अक्कलकुवा पोलीस स्टेशन यांच्या ताब्यात आहे. अर्जातील नमुद वाहन पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास त्यात निश्चितपणे बिघाड होण्याची शक्यता आहे. व तसे झाल्यास अर्जदाराचे नुकसान होईल हेही स्पष्ट आहे. ***सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजराज राज्य ए.आय.आर.२००३ मा. सर्वोच्च न्यायालय ६३८*** या न्याय निर्णयातील मा. सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वानुसार आशा जप्त मुद्येमालासंबंधी त्वरीत आदेश करणे आवश्यक आहे. सदर अभिलेखावरुन हेही दिसुन येते की, अर्जदाराने जप्त वाहनाचे विमा कागदपत्र दाखल केले नाही. पंरतु अमानत रक्कम कोर्टात जमा करुन काही अटींवर जप्त वाहन परत करता येवु शकते तसेच अर्जातील नमुद वाहन योग्य त्या अटी व शर्तीवर अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास अभियोग पक्षाचे कोणतेही नुकसान होणार नाही. अर्जातील नमुद वाहन अर्जदाराच्या दैनंदिन वापराचे असल्याने जप्त वाहनाचा अंतरीम ताबा अर्जदारास देणे योग्य वाटते. उपरोक्त कागदपत्राचे अवलोकन करुन अर्जदार हा सदर जप्त वाहनाचा ताबा परत मिळण्यास पात्र ठरतो. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१} प्रस्तुतचा अर्ज खालील अटीं व शर्तींवर मंजूर करण्यात येतो.

२} **अ.** पोलिस ठाणे, अक्कलकुवा येथील अपराध क्र. ६५८/२०२४ मधील जप्त करण्यात आलेली हिरो कंपनीची सी.डी.डिलक्स मोटारसायकल क्रमांक एम.एच.–१८/ए.के.–७५४२ क्रमांकाच्या मोटारसायकलचा चेचीस क्रमांक MBLHA11EWD9H04406, त्याचा इंजिन क्रमांक HA11EFD9H27291 या वाहनाचा अंतरिम ताबा रक्कम रुपये १५,०००/–(रुपये पंधरा हजार मात्र) चे सुपूर्तनामा सादर केल्यानंतर अर्जदार नामे प्रितेश गणेशमल छाजेड यांना देण्यात यावा.

**ब.** सदर वाहनाच्या स्वरुपामध्ये कोणत्याही प्रकारे फेरबदल/मोडतोड करणार नाही अथवा सदर वाहन अन्य कोणालाही हस्तांतरीत करणार नाही असे वचनपत्र अर्जदाराने सादर करावे.

**क.** अर्जदाराने सदर वाहनाच्या सर्व कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती तपासी अधिकारी यांच्याकडे सादर कराव्यात.

**ड.** न्यायालयाने आदेशित केल्यास हजर राहण्याचे व खटल्याच्या सुनावणीदरम्यान मदत करेन असे वचनपत्र देखील अर्जदाराने सादर करावे.

३} तपासी अधिकाऱ्यास आदेशित करण्यात येते की,

**अ.** सदर वाहनाची चारही बाजूंनी छायाचित्रे काढून त्यावर अर्जदाराच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात.

**ब.** सदर वाहन अर्जदारास परत केल्याबाबत योग्य तो पंचनामा तयार करावा.

**क.** सुपूर्तनामा, वाहन अर्जदारास परत केल्याचा पंचनामा आणि वाहनाची छायाचित्रे हे सर्व दस्तऐवज दोषारोपपत्रात अंतभूत होण्याकरिता १५ दिवसाच्या आत सादर करावेत.

४} प्रस्तुत आदेशाबाबत तपासी अधिकाऱ्यास कळविण्यात यावे.

Digitally signed by SURESH SUBHASH BADGUJAR
Date: 2024.08.03 17:10:01 +0530

( **सुरेश एस. बडगुजर** )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अक्कलकुवा
जिल्हा नंदूरबार.

ठिकाण :– अक्कलकुवा
दिनांक :– ०३/०८/२०२४

**<u>दा ख ला</u>**

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | मयुर धर्मराज पाटील |
| न्यायालयाचे नाव | :– | दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार. |
| आदेश जाहीर केल्याची तारीख | :– | ०३/०८/२०२४ |
| न्यायाधिशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | ०३/०८/२०२४ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | :– | ०३/०८/२०२४ |